पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- १९/१०/२०२०

# किसनेली जंगल परिसरात ०५ नक्षल ठार

- *मृत नक्षलवादयांवर शासनाने जाहीर केले होते १८ लाखांचे बक्षीस*

उपविभाग धानोरा अंतर्गत येणाऱ्या पोलीस मदत केंद्र ग्यारापत्ती हद्दीतील मौजा किसनेली जंगल परिसरात काल सायंकाळी ०४.०० वाजताचे सुमारास गडचिरोली पोलीस दलातील सी-६० चे जवान व नक्षलवादी यांच्यात चकमक झाली. या चकमकीमध्ये सी-६० कमांडोनी शौर्यपुर्ण कामगिरीची नोंद करत ०५ नक्षलवादयांना ठार केले. या जहाल नक्षलवादयांमध्ये ०४ महिला व ०१ पुरुषाचा समावेश आहे. चकमकीमध्ये ठार झालेल्या नक्षलवादयांची ओळख पटली असुन त्यांची माहीती पुढील प्रमाणे आहे.

१) समीता ऊर्फ राजो किरको वय ३४ वर्ष रा. मुंगनेर ता धानोरा जि. गडचिरोली ही प्लाटुन क्र. १५ ची सदस्या होती, ती सन २०११-१२ मध्ये प्लाटुन क्र. २० मध्ये भरती होवुन सन २०१२-१३ मध्ये तिने पोटेगाव दलम सदस्य म्हणुन काम केले. त्यानंतर सन २०१३-१४ ते आज पर्यंत ती प्लाटुन क्र. १५ चे सदस्या पदावर कार्यरत होती. तिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये ०२ खुन, ९ चकमक व इतर ०३ असे एकुण १४ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तिचेवर शासनाने ०४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

२) कुमली चिपळुराम गावडे वय २३ वर्ष रा. कटेझरी ता. धानोरा जि. गडचिरोली ही कोरची दलम सदस्या होती, ती २०१६ मध्ये भरती होवुन, सन २०१६ ते २०१८ पर्यंत टिपागड एलओएस मध्ये कार्यरत होती व सन २०१८ ते २०२० पर्यंत कसनसुर एलओएस मधील डीव्हीसीएम सृजनक्काची बॉडीगार्ड पदावर कार्यरत होती. सद्या ती कोरची दलम सदस्य पदावर कार्यरत होती. तिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये एकुण ०२ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तिचेवर शासनाने ०२ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

३) सुमन ऊर्फ झुनकी ऊर्फ सुलकी बुच्चा पदा वय ३२ वर्ष रा. पिपली बुर्गी ता. एटापल्ली जि. गडचिरोली ही टिपागड दलम एसीएम सदस्या असुन, ती सन २००६-०७ मध्ये भरती होवुन सन २००९ पर्यंत ती मिलीशिया सदस्य म्हणुन कार्यरत होती. सन २००९ ते २०११ पर्यंत ती

इतर राज्यात व जिल्हयात सदस्य म्हणुन काम केले. व त्यानंतर सन २०१२ -१३ मध्ये ती कसनसुर एलओएस मध्ये कार्यरत होती. सन २०१३ ते सन २०१८ पर्यंत ती प्लाटुन क्र. ३ व ४ मध्ये पीपीसीएम म्हणुन कार्यरत होती. सन २०१८-१९ मध्ये प्लाटुन १५ मध्ये ती पीपीसीएम म्हणुन कार्यरत होती. सन २०१९ ते आज पर्यंत टिपागड एलओएसमध्ये एसीएम सदस्या पदावर कार्यरत होती. तिचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये ०१ खुन, १४ चकमक व इतर ०६ असे एकुण २१ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. तिचेवर शासनाने ०६ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

४) चंदा ऊर्फ चंदना ऊर्फ मासे भालसे/भाकसे वय २५ वर्ष रा. बुडगीन ता. जेगरगुन्डा जि. बिजापुर, बस्तर एरिया (छ.ग.) ही प्लाटुन क्र. १५ ची सदस्य असुन, ती सन २०१८ मध्ये भरती होवुन आज पर्यंत प्लाटुन क्र.१५ ची सदस्य म्हणुन कार्यरत होती. तिचेवर शासनाने ०४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

५) टिरा ऊर्फ निलेश ऊर्फ शिवाजी दारसु मडावी वय ३० वर्ष रा. चिचोडा ता. धानोरा जि. गडचिरोली हा टिपागड दलम सदस्य असुन, तो सन २०१५ मध्ये भरती होवुन सन २०१९ पर्यंत चातगाव एलओएस मध्ये सदस्य म्हणुन कार्यरत होता व त्यानंतर सन २०१९ ते आज पर्यंत तो टिपागड दलम सदस्य पदावर कार्यरत होता. त्याचेवर गडचिरोली जिल्हयातील विविध पोलीस स्टेशनमध्ये ०६ खुन, ०७ चकमक व इतर ७ असे एकुण २० गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याचेवर शासनाने ०२ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

या वर्षात आतापर्यंत एकुण १० नक्षलवादयांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलीस दलास यश मिळाले असुन, सन २०२० या वर्षातील गडचिरोली पोलीस दलाची सर्वात मोठी कामगिरी आहे. काल चकमकीत ठार झालेल्या ०५ नक्षलवादयांवर शासनाने एकुण १८ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले होते.

सी-६० कमांडोंच्या या शौर्यपुर्ण कामगिरीचे मा. पोलीस उपमहानिरीक्षक श्री. संदीप पाटील सा़े. व मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़े. यांनी कौतुक केले आहे. त्याचबरोबर नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.